RNI MAHMAR
36829-2010


ISSN- 2229-4929

Peer Reviewed


# Akshar Wangmay

## International Research Journal
## UGC-CARE LISTED

**Special Issue - VII**
**Interdisciplinary View on Socio-Economic, Educational, Management, Environmental, Research, Language and Sustainable Development in Covid-19 Pandemic Situation**



January 2021





Chief Editor : Dr. Nanasaheb Suryawanshi

Executive Editor : Prof. Kartik R. Patil

Principal,
Rashtrasant Tukdoji College, Chimur
Ta-Chimur, Dist-Chandrapur (Maharashtra)

Co-Editor : P. M. Rajurwade





Address
'Pranav', Rukmenagar,
Thodga Road, Ahmadpur, Dist- Latur 413515 (MS)

Assistant Professor

# AKSHAR WANGMAY

International Peer Reviewed Journal

## UGC CARE LISTED JOURNAL

January 2021

## Special Issue-Volume-VII

## On


## *"Interdisciplinary View on Socio-Economic, Educational, Management, Environmental, Research, Language and Sustainable Development in Covid-19 Pandemic Situation"*


Chief Editor
Dr. Nanasaheb Suryawanshi
Pratik Prakashan, Pranav, Rukmenagar, Thodga Road Ahmedpur,
Dist. Latur, 433515, Maharashtra

Executive Editor
Prof. Kartik R. Patil
Principal,
Rashtrasant Tukdoji College, Chimur
Ta-Chimur, Dist-Chandrapur (Maharashtra)

Co-Editor
P. M. Rajurwade
Rashtrasant Tukdoji College, Chimur
Ta-Chimur, Dist-Chandrapur (Maharashtra)

Editorial Board

| | | | |
|---|---|---|---|
| Dr. Praful T. Bansod | Dr. Haresh T.Gajbhiye | Prof. Ashutosh M.Popte | Prof. Pitambar T. Pise |
| Dr. Nitin T. Katrojwar | Dr. Rajeshwar D. Rahangdale | Dr. Laxman T. Kamdi | Dr. Udhay D. Mendulkar |
| Dr. Santosh P. Bansod | Dr. Dilip S.Telang | Prof. Kishor S.Chaure | Dr. Manisha Warma |
| Dr. Rupesh M.Meshram | Dr. Sharad B. Belorkar | Dr. Subhas K. Shinde | Dr. Chetankumar Vyas |


Published by- Prof. Kartik R Patil, Off. Principal, Rashtrasant Tukdoji College Chimur, Ta-Chimur, Dist-Chandrapur (Maharashtra)

The Editors shall not be responsible for originality and thought expressed in the papers. The author shall be solely held responsible for the originality and thoughts expressed in their papers.

© All rights reserved with the Editors

Price :Rs.1000



Assistant Professor
Lokmanya Mahavidyalaya, W...
Dist. Chandrapur

Scanned with OKEN Scanner

| | | |
|---|---|---|
| 23 | A Study on Relationship between Performance and Earnings per Share of selected E-Commerce Companies<br>**Dr. Rakesh Agrawal, Shahrukh Bhati** | 76-79 |
| 24 | A Study on Financial Performance Analysis of Tata Steel Limited<br>**Dr. Rakesh Agrawal, Shahrukh Bhati** | 80-84 |
| 25 | An analysis of export procedures and processes in Dubai: with special reference to Cargosol Logistics Pvt. Ltd.<br>**Dr. Pashmina Shah. Dr. Ameya C. Lohar** | 85-88 |
| 26 | Impact of Covid-19 on Teaching and Learning<br>**Tufan Bhaskar Awatale** | 89-91 |
| 27 | Impact of Pandemic COVID-19 on Education<br>**Dr. Ruprao U. Gaikwad** | 92-94 |
| 28 | Applications od Ethnomedicinal Plants as Immunity Boosters to Fight Covid-19 by the Tribal Lore of Dahanu,Maharashtra<br>**Dr. Urmila Sarkar** | 95-97 |
| 29 | Literature, Media and Politics in Covid 19: An Indian Perspective<br>**Dr. Dharmapl Fulzele, Dr. Lokeshkumar Nandeshwar** | 98-100 |
| 30 | Financial Performance of Cement Companies In India<br>**Haresh Santumal Budhrani, Dr. Anniruddha Sunil Gachake** | 101-103 |
| 31 | Difficulties Of Books Markets In Covid-19 Pandemic Situation<br>**Mr. Dilip Daga Ahire, Ms. Swati Suresh Patil** | 104-106 |
| 32 | Impact of Social Media In India In Covid-19 Pandemic Situations<br>**Junaid Akp** | 107-109 |
| 33 | Food in the Time of Corona: Psychosocial Implications of Hunger and Responses to the Covid-19 Pandemic Situation<br>**Parama Basu** | 110-112 |
| 34 | Effect of Covid-19 on Rural Economy of Chalisgaon Tehsil During Pandemic - A Case Study<br>**Dr. Ajay V Kate, Mukesh S. Patil** | 113-114 |
| 35 | Science Education for Sustainable Development<br>**Dr. Archna Vats** | 115-118 |
| 36 | Green Economy<br>**Mr. Rammapa Savadatti** | 119-120 |
| 38 | Yoga is key of personality development and healthy life<br>**Dr. Metil B.A.** | 121-123 |
| 37 | ~~कोविड-19 का भारतीय औद्योगिक क्षेत्र पर प्रभाव~~<br>**Dr. Rajesh P. Kamble** | 124-125 |
| 38 | पंचायत राजचे ग्रामीण विकासातील योगदान<br>**डॉ. संजय भास्कर तायडे** | 126-128 |
| 39 | कोरोन महामारी आणि नैसर्गिक संसाधने, शाश्वत मानव विकास<br>**प्रा. डॉ विठ्ठल निळकंठराव ठावरी** | 129-131 |
| 40 | कोरोना महामारी व भारतीय शेतकरी<br>**डॉ. भानुदास डी. जामनेकर** | 132-133 |
| 41 | महाराष्ट्रातील ग्रामपंचायत निवडणुक - २०२१ : एक राजकीय विश्लेषण (विशेषतः नागपूर जिल्ह्याच्या संदर्भात)<br>**डॉ. मंगेश गोविंदराव आचार्य** | 134-136 |
| 42 | कोविड -१९ मुळे चंद्रपूर जिल्ह्यातील शेतकरी व शेतमजूरांवर झालेले आर्थिक परिणाम : एक चिकीत्सक अध्ययन<br>**डॉ. हरेश टी. गजभिये** | 137-140 |
| 43 | कोविड-१९ चा भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम<br>**डॉ.सुरेखा भिंगारदिवे** | 141-142 |
| 44 | चंद्रपूर जिल्ह्यातील वरोरा, भद्रावती, चिमुर तालुक्यातील भौगोलीक परिस्थिती व पर्यटनाच्या संधी<br>**प्रा. डॉ. दीपक पां. लोणकर** | 143-147 |




Scanned with OKEN Scanner

'Akshar Wangmay' UGC Care Listed, International Research Journal, ISSN: 2229-4929, January 2021
Special Issue, Volume-VII "*Interdisciplinary View on Socio-Economic, Educational, Management, Environmental, Research, Language and Sustainable Development in Covid-19 Pandemic Situation*"

# चंद्रपूर जिल्ह्यातील वरोरा, भद्रावती, चिमुर, तालुक्यातील भौगोलीक परिस्थिती व पर्यटनाच्या संधी

**प्रा. डॉ. दीपक पां. लोणकर**
लोकमान्य महाविद्यालय, वरोरा, जि. चंद्रपूर (महा.)

**गोषवारा (Abstract)**

विदर्भातील चंद्रपूर जिल्हा हा निसर्ग सौंदर्याने नटलेला असून चंद्रपूर हे औद्योगीक शहर म्हणूनही ओळखले जाते. चंद्रपूर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात जंगल, नद्या व पर्वतीय प्रदेश असून तलाव, मंदीर, गुंफा, नदी मोठ्या प्रमाणात आढळून येते त्यादृष्टीने पुरातत्वीयदृष्ट्याही विपुलता आहे. ताडोबा, आनंदवन यासारखी जागतीक पर्यटन स्थळे या जिल्ह्यात असुन या ठिकाणी वर्षभर पर्यटक भेट देत असतात परंतु पर्यटनाच्या दृष्टीने पाहिजे तसा विकास इतर स्थळांचा झालेला दिसुन येत नाही तसेच भौगोलिक दृष्ट्यही हा जिल्हा संपन्न असला तरी त्याचा योग्य उपयोग झालेला दिसत नाही जर प्रशासनाने जिल्ह्यातील भौगोलिक परिस्थितीचा व जंगल, नद्या, मंदिरे, गुंफा शिल्पे, स्मारके, तलाव ईत्यादींचा योग्य त-हेने वापर करून घेतल्यास या ठिकाणी पर्यटनाच्या मोठ्या संधी उपलब्ध होऊन स्थानिक नागरिकांना रोजगार उपलब्ध होऊ शकतो.

**प्रस्तावना –**

प्राचीन काळापासुनच विदर्भाचा उल्लेख सापडतो. रामायण, महाभारत काळातही विदर्भ राज्य व तेथील शासकांचा उल्लेख आढळतो. पुढील काळात विदर्भावर अनेक शासकांनी शासन केले विशेषता इंग्रज राजवटीत विदर्भ हा सी.पी. अॅन्ड बेरार या प्रांताचा भाग असून नंतर 1956 च्या भाषावर प्रांतरचनेमुळे विदर्भाचा स्वतंत्र प्रदेश निर्माण झाला व तो 1960 मध्ये महाराष्ट्र राज्यात सामिल केला गेला. प्रामुख्याने विदर्भात आजच्या घडीला 11 जिल्ह्याचा समावेश असून भौगोलीक दृष्ट्या पूर्व व पश्चिम विदर्भ असे दोन भाग पडतात. त्यापैकी पूर्व विदर्भात नागपूर, वर्धा, चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया या जिल्ह्याचा समावेश असून चंद्रपूर जिल्ह्याचे 20 ऑगस्ट 1982 मध्ये विभाजन करून स्वतंत्र गडचिरोली हा नविन जिल्हा तयार करण्यात आला.

चंद्रपूर जिल्ह्यालाही प्राचीन, पौराणीक, भौगोलीक वारसा लाभला असून प्राचीन काळात हा जिल्हा दडकारण्याच भाग होता. निसर्ग सौंदर्याने हा जिल्हा नटलेला असून घनदाट जंगल, दगडी कोळसा व सिमेंट, यासाठी हा जिल्हा प्रसिध्द असून इथे मोठ्या प्रमाणात ऐतिहासिक स्थळेव पर्यटनाची विपुलता आहे. परंतु पर्यटनाचा पाहिजे तसा विकास झालेला दिसुन येत नाही.

**उद्दीष्टे –**

1. ऐतिहासिक स्थळाच्या माध्यमातून पर्यटनाचा विकास करणे.
2. मंदीर स्थापत्य व कलाचा अभ्यास करणे.
3. अनभिज्ञ पर्यटन स्थळे जगासमोर आणणे.

**गृहीत्के –**

वरोरा, भद्रावती, चिमूर तालुक्यात पर्यटनाच्या विकासाला वाव आहे.
वरोरा, भद्रावती, चिमूर तालुक्यात पर्यटनाच्या माध्यमातुन रोजगाराच्या संधी उपलब्ध होईल

**भौगोलीक परीस्थिती :-**

चंद्रपूर जिल्ह्याचे क्षेत्रफळ 74 km2 इतके असून समुद्र सपाटी पासुन 230 मी. उंचीवर असुन उत्तर अंशश 19.57 व पूर्व रेखांश ~~79.17 वर वसले आहे.4 चंद्रपूरच्या उत्तरेला नागपूर भंडारा व वर्धा जिल्हाचा काही भाग पश्चिमेस वर्धा व यवतमाळ तर पुर्वेस गडचिरोली~~ तर दक्षिणेस तेलंगाणा या जिल्ह्याच्या सिमा असुन5 "चंद्रपूर, वरोरा, भद्रावती, चिमूर, सिंदेवाही, नागभीड, ब्रम्हपुरी, मूल, गोंडपिपरी, पोभूर्णा, जिवती, राजूरा, बल्लारपूर, कोरपना,सावली असे एकूण 15 तालुके आहेत.6 जिल्ह्याचा बराचसा भाग जंगल व डोंगराळ असून अनेक नद्या व नाले,द-या, झरे, धरणे, उद्याने, तलाव, गुंफा, मंदीर, स्मारके, मुर्त्या, पर्वतरांगा यांची विपुलता मोठ्या प्रमाणात आहे. जिल्ह्यातील डोंगर हे कमी उंचीचे असून वरोरा तालुक्याच्या उत्तरेला चिमूर तालुक्यात डोंगररांग आढळून येते तर मुल तालुक्यातही डोंगररांगा असून चिमूरच्या पुर्वेस परसगड नावाची पर्वतरांग आहे तर नागभिड तालुक्याचा पश्चिमेस सात बहिनीची डोंगर रांग असून राजूरा तालुक्याच्या दक्षिण व पश्चिम भागात माणिकगड टेकड्यांची रांग आहे वरोरा ब्रम्हपूरी व चंद्रपूर तालुक्यातील टेकड्या या (अंदाजे 300 मी.) कमी उंचीच्या आहे.7

या क्षेत्रातील बराचसा प्रदेश हा लाव्हारसामुळे तयार झाला असून काळ्या अग्निजन्य ज्वालामुखी खडकांनी व्यापलेला आहे. त्यामुळे या खडकात 'बेसाल्ट' ा घटक प्रामुख्याने आढळतो.8 तसेच या जिल्ह्यात वर्धा, वैनगंगा, इरई, खोब्रागडी, पोथरा, नगंगा, अंधारी इ. महत्वाच्या नद्या असून त्यामुळे ज्या जिल्ह्यातील प्रदेश नदीच्या गाळामुळे सुपिक झाला आहे. यासोबतच बारमाही वाहनारे नाले, तलाव व आसोलामेंढा, घोडाझरी, नलेश्वर, चारगाव धरण, चंदई नाला, लभान सराड प्रकल्प इ. धरण प्रकल्प असून येथे वाळूचे थर, तांबळी, पिवळी व भु-या रंगाची माती आढळते.9 त्यामुळे या क्षेत्रात पुराश्मयुगीन काळात मध्याश्म युगीन हत्यारे व अवशेष मिळाले असून या जिल्ह्यातील भौगोलीक रचनेमुळे या क्षेत्रात प्रागैतीहासिक काळात मानवाच्या वस्ती होत्या याचे पुरावे मिळाले आहे.10

या जिल्ह्यातील हवामान हे उन्हाळ्यात उष्ण असून, ऋतूनुसार त्यात बदल होतो. या क्षेत्रात नैऋत्य मौसमी वा-याचा पाऊस पडत असून जंगल आहे व त्यात साग, बिजा, ऐन, धावडा, सिसव, मोह, तेंदू इत्यादी झाडाची विपुलता असून 11 फार मोठी जंगल संपदा लाभली



Scanned with OKEN Scanner

आहे. तसेच जंगल व द-याखो-यामुळे वाघ, बिबट, हरीण अस्वल, गवा या सारखी वन्यपशु या जंगलात असल्यामुळे व अनेक पक्षी व सरपटनारे प्राणी या जंगलाच्या वास्तव्यात असल्यामुळे ताडोबा अंधारी हा व्याघ्र प्रकल्पाची निर्मिती केल्या गेली त्यामुळे अनेक अंतर्राष्ट्रीय पर्यटक येथे येतात तसेच येथील प्रमुख उद्योग हा शेती असून शेती बरोबरच कोळसा, सिमेंट, काच, पोलाद, कागद, तेल हे ही उद्योग नैसर्गीक संसाधानामुळे तयार झाले आहे. त्यामुळे त्यामुळे भौगोलीक दृष्टा चंद्रपूर जिल्ह्याला वेगळे महत्व प्राप्त झाले आहे. त्या दृष्टीने चंद्रपूर जिल्ह्यातील वरोरा, भद्रावती व चिमूर तालुक्यातही मोठ्या प्रमाणात पर्यटनाच्या विशेष संधी उपलब्ध असून त्याचा विकास होणे आवश्यक आहे.

ऐतिहासीक कालखंड :-

प्राचीन काळातील साहित्यात विदर्भाचे उल्लेख सापडतात. त्यावेळी चंद्रपूर जिल्ह्याचा समावेश विदर्भात असल्यामुळे आर्य संस्कृतीचा प्रभावही विदर्भावर पडलेला दिसतो व दक्षिणेतील आर्य संस्कृतीच्या प्रचार प्रसाराचे हे स्थान असून विदर्भ नावच्या राजावरुन या प्रदेशाला विदर्भ हे नाव पडले असा उल्लेख सापडतो.12 रामायण व महाभारत काळातही विदर्भ राज्याचा उल्लेख येतो.13 याशिवाय 16 महाजन पदाच्या काळात अस्सक जनपद विदर्भाचा भाग होते असा उल्लेख आढळतो.14 तसेच कौटील्याच्या अर्थशास्त्रातही या प्रदेशाचा उल्लेख सापडतो.15 तर सम्राट अशोकाचा या प्रदेशात म्हणजे चंद्रपूर जिल्ह्यातील देवटेक येथे सापडलेल्या शिलालेखावरुन मौर्यांची राजवट या प्रदेशावर होती याचे पुरावे मिळतात.16 एकुनच मौर्या, शुंग सातवाहन, वाकाटक, नल, शरभपुरीन, मुंड, राष्ट्र कुट चालुक्य, परमार, नागवंशीय, माना वंशीय, यादव इत्यादी प्राचीन साम्राज्यांनी या प्रदेशावर शासन केल्याचे पुरावे मिळतात.17 तसेच या क्षेत्रातील नद्या, डोंगर जंगले यामुळे प्रागैतीहासिक काळात या भागात मानवाने वसाहती केल्याचे उल्लेख आढळून आले आहे. विशेषता पूर्व पुरापाषण, मध्यपूरापाषाण व उत्तर पुरापाषाण काळातील अवजारे या प्रदेशात मोठ्या प्रमाणात मिळाली आहेत.18 तसेच मृदभांडी व उपकरणांचे अवशेषही प्राप्त झाले आहे. त्या दृष्टीने प्राचीन काळापासूनच या प्रदेशाला ऐतिहासिक व पौराणिक महत्व झाले आहे.

या प्रदेशात मोठ्या प्रमाणात जंगले, नद्या, डोंगर, झरे, तलाव इत्यादी संसाधने मोठ्या प्रमाणात असल्यामुळे तत्कालीन राजवंशानी या संसाधनाचा योग्य पद्धतीने वापर करुन येथे मोठ्या प्रमाणात मंदीर, स्मारके, लेणी, गुहा, किल्ले इत्यादी ची निर्मिती केलेली दिसुन येते. त्यामुळे या क्षेत्रात विशेषता वरोरा तालुक्यात भटाळा, खर्वड, वाघनख, मार्डा, वडकेश्वर इत्यादी ठिकाणी प्राचिन मंदीर निर्माण झाली. तर भद्रावती तालुक्यात भद्रावती येथील प्राचीन मंदीर, विजासन, लेणी, गौराळा मंदीर, चंदनखेड्याचा किल्ला, घोडपेठ मंदीर, तसेच मोहर्ली ताडोबा येथील राष्ट्रीय उद्यान व भोसलेकालीन मार्गदर्शक स्तंभ तसेच चिमूर तालुक्यातील बालाजी मंदीर, रामदेगी, नेरी येथील मंदीर, महादवाडी येथील मंदीर, मुक्ताई येथील गुंफा, नागरगोटा (सात बहिनीचे डोंगर) येथील प्रागतैहासिक चित्रकला, घोडाझरी हा निसर्गनिर्मित तलाव, गोंदेडा गुंफा ही ठिकाणे पर्यटन स्थळ अजून विकासाची वाट पाहात आहे.

या मंदीराची व इतर वास्तुंची निर्मिती करतांना तत्कालीन शासकानी पर्यावरणाचा समतोल साधून या प्रदेशातील डोंगररांगामध्ये मिळणा-या मोठ्या प्रमाणातील दगडाचा उपयोग मंदीर निर्मिती व वास्तुनिर्मितीसाठी केला. प्रामुख्याने नद्याच्या तटावर अनेक प्राचीन मंदीराची निर्मिती केली. उदा. वडकेश्वर हे मंदीर वर्धा नदीच्या तीरावर असून तिथे एक नैसर्गिक झरा असून त्यामुळे पाण्याचे नैसर्गिक कुंड तयार झाले आहे. जर टाळी वाजविली तर या कुंडातील पाणी मोठ्या जोराने वर येतांना दिसतो19 त्यामुळे या ठिकाणी पुढे वडकेश्वर मंदीरही बांधल्या गेले. परंतु आज काळाच्या ओघात तो झरा नष्ट झाला आहे. कारण झ-याच्या वरच्या भागात बंधारा बांधल्यामुळे झरा आटला आहे.

ऐतिहासिक व प्रेक्षणिय स्थळे :-

वरोरा, भद्रावती, चिमूर ह्या तालुक्यात अनेक ऐतिहासिक व पौराणिक व प्रेक्षणीय स्थळे असून यासाठी तत्कालीन शासकांनी या क्षेत्रात येथील भौगोलीक परीस्थितीचा व येथील पर्यावरणाचा पूर्णपणे उपयोग करुन घेतलेला दिसतो.

वरोरा तालुका :-

आनंदवन :- वरोरा तालुक्यात आनंदवन हे प्रसिध्द पर्यटन स्थळ असून श्रध्देय बाबा आमटे यांची ती कर्मभूमी म्हणून प्रसिध्द आहे या ठिकाणी कुष्ठरोग्यांची वसाहत असून त्यांच्याकडून स्वयंनिर्मितीचे प्रयोग येथे चालतात.20 त्यामुळे देशविदेशातून लाखो पर्यटक दरवर्षी इथे चालणारे प्रयोग समजून व अनुभव घेण्यासाठी येतात या आनंदवनच्या परीसरात पिजदुरा, येन्सा,कोटबाळा या ठिकाणी संशोधकांनी डायनोसॉरचे अवशेष शोधून काढले आहे21 व ते अवशेष आनंदवनच्या संग्रहालयामध्ये पाहावयास मिळतात.

या वरोरा आनंदवनच्या परीसरात 15 ते 20 कि.मी. क्षेत्रात अनेक प्राचीन स्थळे, मं. े, वास्तु स्मारके आहेत. जर आनंदवनात येणा-या पर्यटकाने थोडी वाकडी वाट धरुन भटाळा, वडकेश्वर, खर्वड, वाघनख, मार्डा, पांझुर्णी रामदेगी, भद्रावती येथील प्राचीन स्थळांना भेटी दिल्यातर या भागात पर्यटनाचे क्षेत्र निर्माण होऊ शकते.

भटाळा :-

भटाळा हे ठिकाण प्राचीन शिल्पग्राम असून या ठिकाणी अश्मयुगीन मानवाचे अवशेष मिळाले आहे. येथील महादेव मंदीर हे भव्य असून मंदीराला कळस नसल्यामुळे या मंदीरला भोंडामहादेव असे म्हणतात.22 येथे 4 फुट उंचीची भव्य शिवलिंग असून मंदीरावर कार्तिकेय, शिव इत्यादी देवतांच्या मुर्त्या कोरल्या आहे.23 हे मंदीर राष्ट्र कुट किंवा परमार कालीन इस. 10 ते 12 व्या शतकातील असून महाशिवरात्रीला इथे मोठी यात्रा भरते.24 तसेच भटाळाच्या दक्षिणेला सालोरी, मार्गावर 10 स्तंभाचे प्राचीन भवानी मंदीर असून या

Scanned with OKEN Scanner

'Akshar Wangmay' UGC Care Listed, International Research Journal, ISSN: 2229-4929, January 2021
Special Issue, Volume-VII *"Interdisciplinary View on Socio-Economic, Educational, Management, Environmental, Research, Language and Sustainable Development in Covid-19 Pandemic Situation"*

मंदीराचा काळ 12-13 शतक सांगितला आहे.25 नंतरच्या काळात या मंदिराचा जिर्णोध्दार झाल्याचे दिसते या सालोरी मार्गावरच पुढे 20 शैलगृहाचा समूह असून तो एकाश्मात आहे.26 ही शैलगृहे लहान आकाराची असल्यामुळे त्यांना Nano Caves असेही म्हणतात. या शैलगृहात शिव, विष्णू, नरसिंह, महिषासुर मर्दीनी यांच्या प्रतिमा आहे. या लेण्याचा कालखंड इ.स. 7 ते 10 शतक असावा27 असा अंदाज आहे. या व्यतिरिक्त भटाळयाच्या परीसरात अनेक ठिकाणी शिल्पे विखुरलेली आहे. त्यामुळे अनेक अभ्यासक व पर्यटक तें पाहण्यासाठी वर्षभर या परिसरात ये – जा करीत असतात. परंतु पर्यटनाच्या दृष्टीने या स्थळाचा विकास झाला नाही.

वडकेश्वर (आमडी) :-

इथे वर्धानदीच्या तीरावर महादेवाचे प्राचीन हेमाड मंदीर असून ते वडकेश्वर या नावाने प्रसिध्द आहे या मंदीराचा नंतरच्या काळात जिर्णोध्दार झाला असून या मंदीराजवळ निसर्गनिर्मित पाण्याचे कुंड आहे. येथेही या काळात यात्रा भरते व अनेक भाविक दर्शनाला येतात.28

वाघनख :-

येथे प्राचीन हेताडपंथी काळया बेसाल्ट पाषाणातील महादेवाचे मंदीर असून हे मंदीर कुठल्याही गाऱ्याचा उपयोग न करता एकावर एक पाषण ठेऊन बांधले आहे. हे मंदीर 12-13 शतकातील असावे29 हे मंदीर पाहायला अनेक अभ्यासक व पर्यटक येतात.

खर्वड :-

खर्वड येथील प्राचीन हेमाडपंथी मंदीर असून हे मंदीर ब्रम्हाचेमंदीर म्हणून ओळखले जाते या मंदीरात ब्रम्हा, विष्णु, महेश यांच्या प्रतिमा असून हे मंदीर चालुक्या काळातील म्हणजे 11-12 शतकातील असावे.30

मार्डा :-

वर्धा नदीच्या तिरावर प्राचीन हेमाडपंथी बांधणीचे बालाजीचे मंदीर असून या मंदीराबद्दल इतिहासकार व पर्यटक अनभिज्ञआहे. चंद्रपूर गॅझेटीअर व इतर कुठल्याही पुस्तकात या प्राचिन मंदीराचा उल्लेख सापडत नाही या मंदीराचा कालखंड 13-14 शतकातील असून नंतरच्या काळात या मंदीराचा परत जिर्णोध्दार झाला आता वर्धा नदीच्या पात्रात तिथे मोठा बंधारा बांधल्यामुळे या ठिकाणी पावसाळयात व हिवाळयात अनेक पर्यटक सहलीसाठी येत असतात. या व्यतिरीक्त वरोरा तालुक्यात अनेक स्मारके, धरणे, किल्ले, नद्या, वास्तू असून त्याचा विकास केल्यास पर्यटनाला बराच वाव आहे.

भद्रावती तालुका :-

भद्रावती तालुक्यातही अनेक प्रेक्षणीय व प्राचीन स्थळे असून भद्रावती हे ठिकाण प्राचीन नगरी होती.

ताडोबा (मोहर्ली) :-

भद्रावती जिल्ह्यातील मोहर्ली (ताडोबा) हे आंतराष्ट्रीय पर्यटन स्थळ असून अनेक देशविदेशातील पर्यटक इथे वन्यजीव व पक्षी पाहण्यासाठी व अभ्यासासाठी येत असतात. ताडोबा येथे एक नैसर्गिक तलाव असून गोंड जमातीचे देवस्थान आहे.31 त्यामुळे धार्मिक श्रध्देपोटी अनेक लोक पौष महिण्यात येथे पुजेला येतात. ताडोबा हे व्याघ्र प्रकल्प होण्याआधी अभयारण्य असतांना इथे पौष महिण्यात मोठी यात्रा भरत असे. आता ती जंगलकायद्यामुळे बंद करण्यात आली तरी ही येथे वर्षभर लाखो पर्यटक भेट देऊन जंगलसफारी करीत असतात.

भद्रावती (भद्रनाग मंदीर) :-

हे प्राचीन मंदीर असून श्रीपुर कोशल येथील पांडुवंशी राजा उद्यन याने भद्रेश्वराची स्थापणा केली. त्यावरुन भद्रक हे नाव पडले असल्याचा उल्लेख गणेशपुराणात सापडतो.32 हे मंदीर आधी शंकराचे असून पुढे नागवंशीय माना राजांनी त्याचा जिर्णोध्दार करुन तिथे नागाची स्थापणा इ.स. 10 व्या शतकात केली. या मंदीरात इ.स. 1386 सालचा शिलालेख ठेवला आहे.33 पण त्याचा भद्रनाग मंदीराशी कुठलाच संबंध नाही. येथे नागपंचमीला मोठी यात्रा भरत असल्यामुळे हजारो पर्यटक येतात.

पार्श्वनाथ मंदीर :-

भद्रावती येथील पार्श्वनाथ मंदीर हे जैन धार्मिकांचे केंद्र असुन 23 वे तिर्थकार भगवान पार्ध्वनाथ यांची प्रतिमा येथे ठेवली आहे. ही प्रतिमा 1910 मध्ये अर्धाभाग जमिनित असलेल्या अवस्थेत पडला होता.34 पुढे जैनसंघाने तिथे भव्य जैन मंदीर बांधले. त्यामुळे येथे देशविदेशातून जैनधर्मिय बांधव तसेच इतर पर्यटकही दर्शनाला व मंदीर पाहण्यासाठी येत असतात हे मंदीर सुंदर व्यवस्थीत असून संगमरवरी दगडाचा वापर करुन बांधले आहे मंदीरातील भिंतीवर अनेक चित्रे रंगविली व कोरली आहे

विजासन लेणी :-

भद्रावतीच्या उत्तरेस 2 किमी. अंतरावर विजासन गावाच्या टेकडीत 3 बौध्द लेण्या कोरल्या असून पुरातत्ववेत्ता कॅनिंगहन यांनी ही आपल्या पुस्तकात या लेण्याचा उल्लेख केला आहे.35 तसेच 7 व्या शतकातील चीन प्रवासी हयु-एन-त्संग यांच्या प्रवासवर्णनातही या लेण्याचा उल्लेख मिळतो.36 या लेण्यात विशाल व बसलेल्या अवस्थतील बुध्द प्रतिमा आहे. इथे एक शिलालेख असून तो ब्राम्हीलीपीतील आहे. ही लेणी इ.स. 3 –या शतकातील हिनयान पंथीयांची असावी असा अंदाज आहे37 त्यामुळे अनेक पर्यटक या ठिकाणी येतात.

इतर :-

Scanned with OKEN Scanner

या शिवाय भद्रावती येथे चंडीका मंदीर, यौवनाश्व मंदीर, भद्रावतीचा किल्ला, देऊरवाडा येथील शैलगृहे इत्यादी प्राचीन स्थळे असून ती पाहण्यासाठी अनेक पर्यटक व अभ्यासक इथे येतात. भद्रावती ही प्राचीन नगरी असून ही बौध्द व जैन धार्मियांचे केंद्र होती कॅनिगहॅम च्या मते येथे 14 गुंफा, 18 मंदीर, 24 विहीरी व 8 तलाव असल्याचा उल्लेख आहे. परंतु काळाच्या ओघात ते अवशेष नष्ट झाले आहे.38

चंदनखेडा :-

भद्रावती तालुक्यात चंदनखेडा येथे गोंडकालीन किल्ला पडक्या अवस्थेत असून या किल्यात दैतराज महाराज उर्फ माधोराज उर्फ माधवराजा या नावाचे गोंडाचे दैवत आहे.39 इतिहासामध्ये ह्या किल्याबद्दलची फारशी माहीती सापडत नाही. त्यामुळे भद्रावती तालुका ताडोबा राष्ट्रीय उद्यानाला लागून असल्यामुळे पर्यटनाच्या विकासाला बराच वाव आहे.

चिमूर तालुका :-

चिमूर तालुक्यातही निसगनि मुक्त उधळन केली असून या तालुक्याचा बराचसाभाग जंगल व द-याखो-यांनी व्यापलेला आहे.

रामदेगी :-

रामदेगी हे ठिकाण ताडोबा –अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या बफर झोन मध्ये समाविष्ठ असून येथे हेमाडपंथी शैलीचे शिवमंदीर आहे.40 या मंदीराचे शिखर द्रविडीयन शैलीचे असून त्यास सीताकुंड असे म्हणतात निसर्गाच्या कुशीत वसलेले हे ठिकाण असून इथे नैसर्गिक कुंड, झरे, गुंफा, ओढा, डोंगरद-या औषधी वनस्पती असून शिवमंदीराच्या वरच्या बाजुला अलीकडच्या काळात एका बौध्द स्तूपाची निर्मिती करण्यात आली असून तिथे भिक्खू ध्यानधारणेसाठी येतात. रामदेगी येथे दोन नैसर्गिक गुफा असून त्यात 50 मानसे सहज बसू शकतील इतक्या मोठ्या आहेत.41 रामदेगीवरुन काही अंतरावर भिमनचापरा हे गुहेसारखे ठिकाण असून महाभारत काळात अज्ञातवासात भिमाने येथे वास्तव्य केल्याची आख्यापिका आहे.42 मार्गशिर्ष महिण्यात रामदेगी येथे मोठी यात्रा भरते तसेच पुर्वपुराश्म युगीन अवशेषही येथे मिळाले आहे.43 परंतु जंगल कायद्यामुळे हे ठिकाण विकासापासुन अधिक दुर आहेत.

चिमूर – (बालाजी मंदीर व हुतात्मा स्मारक)

येथील भोसले कालीन श्रीहरी बालाजीचे मंदीर प्रसिध्द असून भोसल्याचे दिवाण देवाजीपंत चोरघडे यांनी ह्या मंदिराची निर्मिती केली.44 मंदीराला तट्‌भिंत असून 12 लाकडी खांब आहे त्यावर प्राण्याची चित्रे कोरली असुनया माघ महिण्यात मंदीराची घोडायात्रा भरते.45 यावेळी रात्रीला मिरवणूक काढतात. यासाठी विदर्भातील अनेक भाविक चिमूरच्या घोडायात्रेला येतात. भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात चिमूरची क्रांती प्रसिध्द असून येथे 16 ऑगष्ट 1942 रोजी क्रांती झाली. त्यात काही स्वातंत्र्य संग्राम सैनिक शहिद झाले.46 त्यांची आठवण म्हणून चिमूर येथेहुतात्मा स्मारक तयार केल्या गेले आहे. ते पाहण्यासाठीही अनेक पर्यटक येत असतात.

गोंदेडा :-

या ठिकाणी राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी एकांतात तपश्चर्या केली ते हे ठिकाण गोदेडागुंफा म्हणून प्रसिध्द आहे येथे गुरुदेव सेवा मंडळाचे केंद्र असून तुकडोजीचे मंदीर आहे47 अनेक गुरुदेव भक्त येथे येत असतात व तुकडोजी जयंती दिनी येथे यात्रा भरविल्या जाते.

मुक्ताई :-

चिमूर तालुक्यातच मुक्ताई हे निसर्गरम्य ठिकाण असून जंगल व डोंगरानी वेढलेले आहे येथे मुक्ताईची पाषाण गुंफा असून जवळच दगडाचे कुंड आहे.48 येथे पावसाळ्यात जलप्रपात (धबधबा) वाहत असून त्याचा आनंद घेण्यासाठी विदर्भातून पर्यटक येथे येतात.

सातबहिणीचे डोंगर (नागरगोटा) :-

सात बहिणीच्या डोंगररांगामध्ये डोंगराच्या वरच्या भागात 3 गुंफा (शिलाश्रय) असुन ते वालुका पाषानातील आहे. या शिलाश्रयात प्रागैतीहासिक मानवाने रेखाटलेले चित्रे असून त्यात स्त्रि, पुरुष, हरिण, गवा इत्यादी चित्रे रंगविली आहे.49 या परिसरातच मध्याश्मयुगीन हत्यारे सापडली आहे. याशिवाय नेरी येथील महादेव मंदीर, महादवाडी येथील मंदीर हे प्राचीन असून हेमाडपंथी शैलीचे आहे. चिमूर तालुक्याला लागूनच घोडाझरी हा निसर्गनिर्मीत तलाव असून नुकताच त्याला अभयारण्याचा दर्जा मिळाला आहे. त्यामुळे या तलाव पाहण्यासाठी व सहलीसाठी हजारो पर्यटक वर्षभर इथे येत असतात.

निष्कर्ष / मूल्यमापन :-

या तिन्ही तालुक्याचा पर्यटनाच्या दृष्टीने विचार केल्यास पर्यटनाच्या अनेक संधी या क्षेत्रात उपलब्ध आहे. विशेषता ही तिन्ही तालुके ताडोबा – अंधारी व्याघ्र प्रकल्पाला लागून असल्यामुळे या तालुक्याच्या क्षेत्रात जंगलाचा बफर झोन तयार झाला आहे त्यामुळे या तालुक्यातील बराचसा प्रदेश हा बफर झोन मध्ये येत असल्यामुळे पर्यटनाला येथे चालना मिळू शकते. ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पात वाघांची संख्या येथील पोषक पर्यावरणीय परीसंस्थेमुळे वाढल्यामुळे वाघांच्या अधिवासाला मर्यादा येऊ लागल्या आहेत त्यामुळे हे वाघ जंगलाचे कोअर क्षेत्र सोडून बफर क्षेत्रात ते आपला अधिवास करु लागले आहेत. यातूनच मानव वन्यजिव संघर्ष या क्षेत्रात सुरु झाला आहे त्यामुळे वनविभागाने या क्षेत्रात जंगल सफारीच्या संधी उपलब्ध केल्यास देशी विदेशी पर्यटक आपली हौस भागविण्यास या क्षेत्रात येऊ शकतो. तसेच वनविभागाने या बफर क्षेत्रातील मंदिर, स्मारके, गुंफा, लेण्या, किल्ले, झरे, जलप्रताप इत्यादीचा वापर पर्यटन स्थळ म्हणून केल्यास बफर क्षेत्रात जंगल सफारी बरोबरच या गोष्टीचा ही आनंद पर्यटक घेऊ शकतील. त्यामुळे या क्षेत्रातील पर्यटनाला विशेष महत्व

Scanned with OKEN Scanner

प्राप्त होईल. तसेच ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाची प्रवेश द्वारे उदा. मोहर्ली, खुटवंडा, नवेगाव - कोलारा, अलिझंझा हा या तिन्ही तालुक्यात असल्यामुळे येथील जंगल सफारी आटोपुन परतल्यानंतर पर्यटकाने थोडा वेळ काढून या क्षेत्रातील पर्यटन स्थळांना भेटी दिल्यातर त्याचा वेळही सत्कारणी लागेल. त्या दृष्टीने या तालुक्यातील उपेक्षीत पर्यटन स्थळाचा विकास झाल्यास या क्षेत्रात 'पर्यतटन कॅरीडॉर' तयार होण्याच्या संधी आहे. त्यामुळे या क्षेत्रातील बेरोजगारांना रोजगार उपलब्ध होईल व पर्यावरणाचे ही संरक्षण होऊन संतुलन राखल्या जाईल. त्यादृष्टीने वरोरा, भद्रावती, चिमुर हि तिन तालुके पर्यटन विकासाची वाट पाहत आहे.

संदर्भ :-

प्राथमिक साधने :-

1. पाठक अरुण चंद्र (संपा), 'महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर इतिहास : प्राचिन काळ (खंड – 1)', दर्शविका विभाग प्रकाशन, महाराष्ट्र शासन, मुंबई, 2010
2. पाठक अरुण चंद्र (संपा), 'महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर मध्ययुगीन कालखंड : खंड – 2', दर्शनिका विभाग प्रकाशन, महाराष्ट्र शासन, मुंबई, 2014
3. पाठक अ. श. (संपा), 'महाराष्ट्र इतिहास – प्राचिनकाळ – स्थापत्य व कला', दर्शनिका विभाग प्रकाशन, महाराष्ट्र शासन, मुंबई, 2009
4. Grant Charles ed, 'The Gazzetteer of the Central Provinces of India', Education Society Pross, Bombay, 1870

दुय्यम साधने :-

1. कामडी खुशलदास, 'भद्रावती दर्शन', वत्सविनायक प्रकाशन, पुणे, 2009
2. कुंटे मोरेश्वर व कुटे विजया, 'देवदर्शन जिल्हा चंद्रपूर व गडचिरोली', मदीर कोश प्रकाशन, पुणे, 2012
3. डॉ. टेंभेकर नलिनी, 'पर्व विदर्भातील ऐतिहासिक व प्रेक्षणीय स्थळे', पिंपळापूरे प्रकाशन, 2010
4. डॉ. बोरकर र रा 'चंद्रपूर गडचिरोली जिल्ह्याचे पुरातत्व', सुयश प्रकाशन, नागपूर, 2009
5. मिश्र भगवतीप्रसाद, 'भारतीय स्वातंत्र संग्राममे चंद्रपूर', रमा प्रकाशन, चंद्रपूर, 1986.
6. डॉ. मेश्राम प्रदिप, व खोब्रागडे प्रियदर्शी, 'भद्रावती पुरातत्वीय वैभव', संकेत प्रकाशन, नागपूर, 2004
7. डॉ. मेश्राम प्रदिप, 'भटाळा एक उपेक्षित शिल्पग्राम', संकेत प्रकाशन, नागपूर, 2005
8. राजूरकर अ.ज. 'चंद्रपूरचा इतिहास', हरिवंश प्रकाशन, चंद्रपूर, 2000.

Scanned with OKEN Scanner